
# चालणारा डोंगर



IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 1 6/16/23 16:52



एक होता उंट. सर्वात मोठा,
दोन वाशीडांचा.


IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 2 6/16/23 16:52

मोठा होता म्हणून भाव खायचा.
एकटा-एकटा रहायचा.



IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 3 6/16/23 16:52

एक दिवस मोठे वादळ आले. खूप माती उडाली.



IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 4 6/16/23 16:52

उंट मात्र झोपूनच राहिला. त्याच्या सर्वांगावर माती जमा झाली. वाशीडे मात्र बाहेर राहिली.



IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 5 6/16/23 16:52

तिथे दोन कासवं आली.
वाशीडांना पाहून त्यांना ते डोंगर
आहेत असे वाटले.



IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 6 6/16/23 16:52

कासवं त्यावरुन चढायला-
उतरायला लागली. त्यांना खूप
मजा येऊ लागली.




IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 7 6/16/23 16:52

तेवढ्यात उंटाला जाग आली.
तो हलला-डोलला आणि उठला.




कासवांनी पटकन
उडी मारली.
म्हणाले- पळा-
पळा डोंगर चालतो
आहे.



IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 8 6/16/23 16:52

उंट विचार करू लागला,
हा डोंगर कसा असतो!




एक दिवस फारच उकडत होते. उंट पाण्यात जावून बसला. पण त्याची वाशीडे बाहेर राहिली.




IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 10 6/16/23 16:52

दोन बेडूक आले.
वाशीडांना पाहून
त्यांना ते डोंगर आहेत
असे वाटले.




IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 11 6/16/23 16:52

संध्याकाळ झाली आणि उंटाला
जाग आली. बेडकांनी पटकन
उडी मारली. म्हणाले- पळा-
पळा डोंगर चालतो आहे.



उंट विचार करू
लागला, सगळे मला
डोंगर का म्हणत
असतील!





तो डोंगर शोधायला निघाला.




जंगल पार केले.



IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 14 6/16/23 16:52






नदी पार केली.




रस्त्यात त्याने मैदान पार केले.

IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 15 6/16/23 16:52

चालता-चालता रात्र झाली.
तो थकून झोपून गेला. रात्री बर्फ पडले.



सकाळ झाली तर चोहिकडे बर्फ
होते पण वाशीडे मात्र बाहेरच होती.



IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 17 6/16/23 16:52




तिथे दोन उंदीर आले. वाशीडांना पाहून त्यांना ते डोंगर आहेत असे वाटले. त्यावरुन चढायला-उतरायला लागले.

उंटाला जाग आली.तो उठला. उंदरांनी पटकन उडी मारली. म्हणाले- पळा-पळा डोंगर चालतो आहे.

इतक्यात उंटाला समोरचे डोंगर दिसले.





डोंगरांना पाहून उंट म्हणाला-
अरे बापरे! येवढा मोठा उंट!

IN-LLP-16-0074_Text_TheWalkingMountain.indd 20 6/16/23 16:52